<u>मंत्रिमंडळ सदस्यांचा ज्येष्ठता क्रम ठरविण्यासाठी विहित केलेल्या मार्गदर्शक सूचीमध्ये सुधारणा करण्याबाबत.</u>

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. जीएडीपी-२०१३/१२३६/भाग-१/३०
मंत्रालय, मुंबई-३२.
दि. १८ ऑक्टोबर, २०१७

<u>वाचा :</u>- १) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. जीएडीपी-२०१३/१३३६/३०, दि. १५ जुलै, २०१३
२) सा.प्र.वि. शासन निर्णय क्र. जीएडीपी-२०१६/प्र.क्र.२०५/३०, दि. १७ नोव्हेंबर, २०१६

<u>प्रस्तावना :-</u>

मंत्रिमंडळ सदस्यांचा ज्येष्ठताक्रम ठरविण्यासाठी मार्गदर्शक सूची तयार करण्याबाबत आवश्यक तत्त्वे संदर्भाधीन क्र. १ येथील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १५ जुलै, २०१३ नुसार निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर मार्गदर्शक सूचीमध्ये अंशत: दुरुस्ती संदर्भाधीन क्र. २ येथील सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि. १७ नोव्हेंबर, २०१६ अन्वये करण्यात आली आहे. विद्यमान मंत्रिमंडळात उप मुख्यमंत्री हे पद नसल्याने व विधान परिषदेतील कामकाजाच्या दृष्टीने विधानपरिषद सभागृह नेत्याचे महत्त्व विचारात घेता मंत्रिमंडळ सदस्य ज्येष्ठताक्रम यादीमध्ये विधान परिषद सभागृह नेत्याचे स्थान याबाबत उचित दुरुस्ती करण्याबाबतची आवश्यकता निर्माण झालेली आहे. या दोन्ही शासन निर्णयाने निश्चित केलेली तत्त्वे व वर्गवारी यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन परिपत्रक:-

विधान परिषदेतील कामकाजाच्या दृष्टीने विधान परिषद सभागृह नेत्याचे महत्त्व विचारात घेऊन संदर्भाधीन क्र. १ येथील सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. १५ जुलै, २०१३ मधील अनुक्रमांक I नुसार मंत्रिमंडळ सदस्यांची **<u>सुधारित</u>** ज्येष्ठता यापुढे अर्थातच मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, विधान परिषद सभागृह नेता (म्हणजेच महाराष्ट्र विधान परिषद नियम-२ पोटनियम जे-१ मधील तरतूदीनुसार मुख्यमंत्र्यांनी विधान परिषद सभागृह नेता म्हणून नियुक्त केलेला विद्यमान मंत्रिमंडळातील मंत्री), कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री आणि उपमंत्री अशा उतरत्या क्रमाने असेल. याच शासन निर्णया सोबतच्या सहपत्रातील II) - उप मुख्यमंत्री यानंतर II A) - विधान परिषद सभागृह नेता याप्रमाणे नवीन वर्गवारी निश्चित करण्यात येत आहे.

२. वरीलप्रमाणे विधान परिषद सभागृह नेत्याची वर्गवारी निश्चित करण्यात येत असल्याने संदर्भाधीन क्र. २ येथील दि. १७ नोव्हेंबर, २०१६ चा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा सांकेतांक २०१७१०२३११२१५६४१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Satish K Jondhale

Digitally signed by Satish K Jondhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96b5b527d7131539d3b3eb3ba523bb3514dd3d3437a78ac0f73c6d8043215729, cn=Satish K Jondhale
Date: 2017.10.23 11:13:50 +05'30'

(स. का. जोंधळे)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) अपर मुख्य सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई-३२.
२) अपर मुख्य सचिव (र.व का.) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४) अपर मुख्य सचिव व मु.रा.अ., सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई. (पत्राने)
६) सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
७) सह सचिव, मा. मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
८) उप सचिव, मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
९) सह सचिव (कार्या.२१), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१०) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.